# जिल्हा परिषद, गडचिरोली
# वित्त विभाग

दुरध्वनी क्रमांक:-07132-222350 EmailID-cafozpgad@gmail.com

जावक क्रमांक /जिपग/अवि/वे.प./ 506 /2025, दिनांक:- 3 /06/ 2025

**आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना देय असलेल्या एकस्तर पदोन्नती वेतनश्रेणीच्या लाभाबाबत.**

**संदर्भ :-**1. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक-टिआरएफ-2000/प्र.क्र.3/बारा दि.06.08.2002

2. या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक वित्त/ले.अ./वेतन पडताळणी/5245/2018 दि.05.12.2018

3. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही 2022/प्र.क्र.48/कार्यासन 12 दिनांक 29 फेब्रुवारी, 2024.

**परिपत्रक :-**

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय क्रमांक 1 मधील 3(7) अन्वये आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात काम करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून गट-अ ते ड मधील सर्व पदधारकांना सबंधित कर्मचारी / अधिकारी त्या क्षेत्रात कार्यरत असेपर्यंतच्या काळात त्यांनी धारण केलेल्या मुळ पदाच्या नजीकची वरिष्ठ / पदोन्नतीची वेतनश्रेणी व त्या अनुषंगाने वेतन निश्चितीचा लाभ देण्यात यावा. ज्या कर्मचारी / अधिकाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे. त्यांना आणखी वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय नसेल, अशी तरतुद आहे.

संदर्भिय परिपत्रक क्रमांक 02 नुसार आदिवासी मर्यादित क्षेत्रात प्रोत्साहन म्हणून एकस्तर वेतनश्रेणी तात्पुरती स्वरुपात अनुज्ञेय आहे. परंतू कालबध्द पदोन्नती, आश्वासित प्रगती योजना, चटोपाध्याय आयोगाच्या अनुषंगाने वरिष्ठ वेतनश्रेणी नियमित असुन संपुर्ण क्षेत्रात अनुज्ञेय आहे. त्यामुळे वित्तीय नियमानुसार सेवा अंतर्गत वेतनश्रेणीनुसार वेतनाचे प्रदान होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर परिपत्रकानुसार दिनांक 04.09.2009 व दिनांक 13.11.2014 रोजीचे पत्र रद्द करुन शासन निर्णय दिनांक 06 ऑगस्ट, 2002 मधील परिच्छेद 3(7) अन्वये कार्यवाही करुन मुळ पदाचे वेतन श्रेणीनुसार वेतन निश्चिती करण्यात यावी, तसेच त्या अनुषंगाने झालेल्या अतीप्रदानाची वसुली तात्काळ करण्यात यावी असे निर्देशीत केले आहे.

संदर्भिय शासन परिपत्रक क्रमांक 03 नुसार शासन निर्णय दिनांक 06.08.2002 मधील 3(7) मधील तरतुदीचा योग्य अन्वयार्थ स्पष्ट केलेला आहे. त्यामुळे या कार्यालयाचे संदर्भिय क्रमांक 2 चे परिपत्रक दिनांक 05.12.2018 याव्दारे रद्द करुन गट-अ ते ड मधील सर्व पदधारकांना आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असेपर्यंतच्या काळात शासन परिपत्रक दिनांक 29.02.2024 मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करुन एकस्तर वरिष्ठ / पदोन्नतीचा लाभ देण्याबाबत कार्यवाही करुन आर्थिक लाभ अनुज्ञेय होत असल्यास थकबाकी

Scanned with OKEN Scanner

/ वसुली केलेली रक्कम सबंधीताकडून **वचनपत्र** भरुन घेवूनच अदा करावी. तसेच एकस्तर पदोन्नती वेतनश्रेणीच्या लाभापासुन कोणताही अधिकारी / कर्मचारी वंचीत राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

जिल्हा परिषद, गडचिरोली अंतर्गत एकस्तर पदोन्नती थकबाकी मिळण्याकरिता मा. न्यायालयात दाखल केलेल्या न्यायालयीन प्रकरणाचे अनुषंगाने सदर परिपत्रक सबंधित अधिवक्ता यांना निदर्शनास आणुन सदर न्यायालयीन प्रकरणे निकाली काढण्याकरिता सबंधित विभागानी तात्काळ कार्यवाही करावी.

सही/-
**(सुहास गाडे भा.प्र.से.)**
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, गडचिरोली

**प्रतिलिपी :- माहितीस तथा उचित कार्यवाहीस अग्रेषित.**

1. खाते प्रमुख --------------------------------------------------------(सर्व), जिल्हा परिषद, गडचिरोली.
2. गट विकास अधिकारी / गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, --------------------------(सर्व).
3. उप विभागीय अभियंता (बांधकाम/सिंचाई/ग्रा.पा.पु.) उप विभाग, ------------------------(सर्व).
4. बाल विकास प्रकल्प अधिकारी, ए.बा.वि.से.योजना कार्यालय, -----------------------(सर्व).
5. पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती, ---------------------------(सर्व).
6. वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र,-----------------------------------.
7. मुख्याध्यापक, जिल्हा परिषद हायस्कुल, ------------------------------------.

**(सुहास गाडे भा.प्र.से.)**
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, गडचिरोली

Scanned with OKEN Scanner